मध केंद्र योजना (मधमाशा पालन) योजना
सन २०१९-२० करीता अर्थसंकल्पीय तरतूद
वितरीत करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- केव्हीबी-२०१७/प्र.क्र.१६/उद्योग-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १. शासन निर्णय सम क्रमांक दिनांक १८ जुन २०१९
२. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामद्योग मंडळाचे क्र. कार्यासन मध विभाग/ मधकेंद्र योजना / २०१९/२०६४-२०६६ दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यात सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेती व्यवसायावर उपजिवीका करत आहे. मधमाशांमुळे शेती उत्पनात भरघोस वाढ होत असल्याने मध उद्योगाला अधिक चालना देणे तसेच मध उद्योग हा केवळ शेतीपुरक व्यवसाय व जोडधंदा म्हणून न करता एक मुख्य उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

मधमाशा पालन हा एक वैशिष्टयपूर्ण बहुउद्देशिय उद्योग आहे. मध संकलन, पराग संकलन, मधमाशांच्या वसाहतींची संख्या वाढविणे, या उद्योगातील उप उत्पादनांचे संकलन करणे, तसेच मराठवाडा विभागात तेलबियांच्या पीकांचे असणारे अधिक व पश्चिम घाट क्षेत्रात व तसेच विदर्भातील जिल्ह्यांत असणारे वनक्षेत्र, कोकण विभागातील जंगल व फळबागांचे क्षेत्र अशी वैविध्यपूर्ण निसर्ग संपदा असल्याने राज्यात मध उद्योगाच्या विकासाला मोठा वाव आहे. त्यादृष्टीने मधमाशा पालन उद्योग हा सदर उद्दिष्टांशी सुसंगत असा उद्योग असल्याने मधमाशा पालन उपक्रमास उद्योग म्हणून चालना देण्यासाठी राज्यात सर्व जिल्हयांत सदर योजना राबविण्यास शासनाच्या संदर्भ क्र. १ शासननिर्णयाव्दारे मान्यता देण्यांत आलेली आहे. मध केंद्र योजना (मधमाशा पालन) या योजनेसाठी अर्थसंकल्पीत करण्यांत आलेली तरतूद रुपये ६०.००लक्ष (रुपये साठ लक्ष फक्त) (६० टक्क्यांच्या मर्यादेत) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास वितरीत करण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने त्यांच्या संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सादर केलेल्या खालील खर्चाच्या प्रस्तावास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यांत येत आहे. सदर अंमलबजावणी करताना याबाबतचे धोरण, शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे तसेच वित्तीय नियमावली नुसार करावयाचे आहे.

खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनेतील घटक	भौतिक (लाभार्थी संख्या)	अपेक्षित आर्थिक खर्च (लक्ष)
१.	मधपाळ प्रशिक्षण कार्यक्रम	१८०	५.४०
२.	प्रगतीशिल मधपाळ प्रशिक्षण कार्यक्रम	१२	०.७२
३.	विशेष (छंद) प्रशिक्षण कार्यक्रम	६७	१.३३
४.	जनजागृती शिबिरे व मेळावे	१३	३.९६
५.	साहित्य पुरवठा व अनुदान १. मधपाळ २. प्रगतीशिल मधपाळ	 १८० १२	 ३४.५५ १३.७४
६.	इमारत देखभाल व दुरुस्ती	---	०.३०
	एकुण रुपये		६०.००

मधमाशा पालन योजनेवरील खर्च हा मागणी के-७, २८५१ ग्रामोद्योग व लघुउद्योग, १०५ खादी व ग्रामोद्योग, (००) (०९) मधकेंद्र (कार्यक्रम) (२८५१ ५३२६) या लेखाशीर्षाखालील (२८५१ ५३२६) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० करीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय , वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि.१७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८- भाग-१, उपविभाग-३,अनुक्रमांक ४ नियम क्रमांक २७ (२) अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०८२११५१००२७११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kavita Vijay Pawar

Digitally signed by Kavita Vijay Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a3b87786359abd7b3f135e9849f2f0e3f2ca97e8ca2dd67ad836635a3aa0ea9, serialNumber=6f8674619c7f615d9eeac52c9289956e27601f17938f0e253b14bde8e35e822e, cn=Kavita Vijay Pawar
Date: 2019.08.22 16:56:38 +05'30'

(कविता पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
३. अर्थ सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी) बाह्य लेखा परीक्षा विभाग, मुंबई.
९. लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई. (५ प्रती)
१०.कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१६/अर्थसंकल्प-१४/अर्थोपाय), मंत्रालय, मुं-३२
११.कार्यासन अधिकारी (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती (उद्योग-६).

-